# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Risod**

**Date of Good Work done** :- **02/02/2023**

**Brief of the work done :-**

शेतमालाची चोरी करणारे चोरटे पो.स्टे. रिसोड पोलीसांच्या ताब्यात.

## शेतमालाची चोरी करणारे तिघे गजाआड

### कंकरवाडी येथील शेतमाल चोरीप्रकरण

**रिसोड,** दि. १ (प्रतिनिधी)

तालुक्यातील कंकरवाडी शेतशिवारातून शेतमालाची चोरी करणाऱ्या तीन चोरट्यांना पोलिसांनी ३१ जानेवारी रोजी गजाआड केले

अधिक माहितीनुसार, कंकरवाडी येथील अंकुश जायभाये यांचे तुरीचे १७ कट्टे चोरट्यांनी मध्यरात्री लंपास केले. सदर प्रकार लक्षात येताच जायभाये यांनी परिसरात शोधाशोध केली असता गावातील हनुमान मंदिराजवळ दोन दुचाकीस्वार दिसून आले. यावेळी कुटुंबियासह त्याठिकाणी पाहणी केली असता तुरीचे तीन कट्टे तेथे आढळून आले. या प्रकाराची माहिती डायल ११२ वरुन पोलिसांना देण्यात आली. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळ गाठून चोरट्यांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी अज्ञाताविरुध्द गुन्हा दाखल करुन तपास केला असता गावातील गोपाल फुफाटे, भागवत डाखोरे व मनोहर जाधव यांना ताब्यात घेतले असून पुढील तपास केल्या जात आहे.